माहिती हवीय?

भरत चंद्रकांत कालुवाला, माहीम कॉजवे.

☐ चित्रपट व्यवसायात आतापर्यंत तीनहून अधिक पिढ्यांनी काम केलेली किती घराणी आहेत?

— एकच घराणे कपूर घराणे. पहिली पिढी पृथ्वीराज कपूर यांची दुसरी पिढी राज, शम्मी, शशी कपूर यांची, तिसरी पिढी रणधीर, ऋषी व राजीव कपूर यांची आणि चौथी पिढी करिश्मा व करिना कपूर यांची.

रविकांत रोहिदास साखरे, जामखेड.

☐ *पटलं तर व्हय म्हणा, कौल दे खंडेराया, ईर्षा, तेवढं सोडून बोला, एक माती अनेक नाती, ही नार रूपसुंदरी, पायदळी पडलेली फुलं* या चित्रपटाचे नायक-नायिका व दिग्दर्शक कोण?

— *पटलं तर व्हय म्हणा*: नायक-नायिका चंद्रकांत-सुषमा, दिग्दर्शक-प्रभाकर नायक. *कौल दे खंडेराया*: नायक-नायिका सूर्यकांत-उमा, दिग्दर्शक-कृष्णा पाटील. *ईर्षा*: नायक-नायिका किशोर जाधव-उषा नाईक, दिग्दर्शक-सूर्यकांत. *तेवढं सोडून बोला*: नायक-नायिका यशवंत दत्त-सुषमा, दिग्दर्शक-प्रभाकर नायक. *एक माती अनेक नाती*: नायक-नायिका: कुलदीप पवार-अनुपमा, दिग्दर्शक-कृष्णा पाटील. *ही नार रूपसुंदरी*: नायक-नायिका सूर्यकांत-जयश्री गडकर, दिग्दर्शक-प्रभाकर नायक. *पायदळी पडलेली फुलं*: नायक-नायिका चंद्रकांत सुलोचना, दिग्दर्शक अनंत माने.

सुमन लहू कोळी, वरेडी.

☐ हिंदी चित्रपटात खलनायकाची भूमिका करणारा पहिला मराठी कलाकार कोण?

— बाबूराव पेंढारकर.

☐ निळू फुलेंनी भूमिका केलेले हिंदी चित्रपट कोणते?

— *सौ दिन सास के, रामनगरी, कुली, मशाल, सारांश.*


राजेश दिनकर सावंत, कुर्डूवाडी.

☐ शोभना समर्थनी कधी हिंदी चित्रपटात काम केलंय का? असेल तर चित्रपट कोणते? नायक-दिग्दर्शक कोण? हे चित्रपट केव्हा आले होते?

— शोभना समर्थ हिंदीत लोकप्रिय नायिका होत्या. *निगाहे नफरत* (नायक-दिग्दर्शक मा. विनायक १९३५), *दो दीवाने* (नायक-मोतीलाल, दिग्दर्शक-सी.एम. लुहेर १९३६), *कोकीला* (नायक-मोतीलाल, दिग्दर्शक-सर्वोत्तम बदामी, १९३७), *इंडस्ट्रीयल इंडिया* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-मोहन सिन्हा, १९३८), *पती पत्नी* (नायक-वास्ती, दिग्दर्शक-दादा गुंजाल, १९३९), *साधना* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-वीरेंद्र देसाई व एम.ठाकूर, १९३९), *अपनी नगरिया* (नायक-नझीर, दिग्दर्शक-दादा गुंजाल, १९४०), *सौभाग्य* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-सी.एम.लुहेर, १९४०), *दर्पण* (नायक-बलवंत सिंह, दिग्दर्शक-ए.एच.इस्सा, १९४१), *हॉलीडे इन बॉम्बे* (नायक-अरुण, दिग्दर्शक-सर्वोत्तम बदामी, १९४१), *बारात* (नायक-हरीश, दिग्दर्शक-दादा गुंजाल, १९४२), *भरत मिलाप* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-विजय भट्ट, १९४२), *माता* (नायक-चंद्रकांत, दिग्दर्शक-दादा गुंजाल, १९४२), *नयी दुनिया* (नायक-जयराज, दिग्दर्शक-कारदार, १९४२), *सवेरा* (नायक-अरुण, दिग्दर्शक-वीरेंद्र देसाई, १९४२), *शोभा* (नायक-शाहू मोडक, दिग्दर्शक-कुमारसेन समर्थ, १९४२), *स्वामीनाथ* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-वजाहत मिर्झा, १९४२), *महासती अनूसया* (नायक-शाहू मोडक, दिग्दर्शक-व्ही.एम. व्यास, १९४३), *नौकर* (नायक-बलवंत सिंह, दिग्दर्शक-शौकत हुसेन, १९४३), *रामराज्य* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-विजय भट्ट, १९४३), *विजयलक्ष्मी* (नायक-मोतीलाल, दिग्दर्शक-जी.एस. कश्यप, १९४४), *इन्सान* (नायक-किशोर साहू, दिग्दर्शक-बाबूभाई जानी, १९४४), *नल दमयंती* (नायक-पृथ्वीराज, दिग्दर्शक-कुमार सेन समर्थ, १९४५), *श्री कृष्णार्जुन युद्ध* (नायक-पृथ्वीराज, दिग्दर्शक-मोहन सिन्हा, १९४५), *तारामती* (नायक-वसंत टेंगडी, दिग्दर्शक राजा नेने, १९४६), *वीर कुणाल* (नायक-दिग्दर्शक किशोर शाहू, १९४६), *उर्वशी* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-बाबूभाई जानी, १९४७), *मलिका* (नायक-दिग्दर्शक नझीर), *सती तोरल* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-नंदलाल जसवंतलाल, १९४७), *शाहकार* (नायक-अनवर, दिग्दर्शक-एस.खलिल, १९४७), *वीरांगना* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-नंदलाल जसवंतलाल, १९४७), *रामबाण* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-विजय भट्ट, १९४८), *रामविवाह* (नायक-प्रेम अदीब, दिग्दर्शक-प्रेम अदीब, १९४९) या हिंदी चित्रपटात शोभनाबाई नायिकेच्या भूमिकेत चमकल्या. या चित्रपटांपैकी *निगाहे नफरत* हा त्यांचा पहिला चित्रपट *विलासी ईश्वर* या नावाने मराठीत निर्माण झाला होता. त्यानंतर *घरजावई* (नायक-अविनाश, दिग्दर्शक-कुमार सेन समर्थ, १९४१), *भरत भेट* (नायक-चंद्रकांत, दिग्दर्शक-विजय भट्ट, १९४३), *रामराज्य* (नायक-चंद्रकांत, दिग्दर्शक-विजय भट्ट, १९४४) या मराठी चित्रपटात चमकल्या, या चित्रपटांपैकी *रामराज्य* व *भरत भेट* हे चित्रपट मराठीबरोबर हिंदीतदेखील होते.

परदेस परशुराम कोळी, हमदापूर.

☐ धर्मेंद्र व अमिताभ यांनी कोणत्या चित्रपटात पहिल्यांदा एकत्र काम केलं? नायिका कोण? त्या दोघांना कोणत्या चित्रपटासाठी राष्ट्रीय पुरस्कार मिळालाय?



चुपके चुपकेमध्ये धर्मेंद्र, ओमप्रकाश आणि अमिताभ

— १९७५चा *चुपके चुपके* हा अमिताभ व धर्मेंद्र यांनी एकत्र भूमिका केलेला पहिला चित्रपट. या चित्रपटात जया अमिताभची नायिका होती व शर्मिला टागोर धर्मेंद्रची. अमिताभला *अग्निपथ*साठी राष्ट्रीय पुरस्कार मिळाला होता. धर्मेंद्रला कधीच राष्ट्रीय पुरस्कार मिळालेला नाही.

☐ ऑस्कर पुरस्कारासाठी आतापर्यंत किती भारतीय चित्रपटांना नामांकन मिळालंय?

— *मदर इंडिया, सलाम बॉम्बे* व आता *लगान*. पण त्यांची झेप नामांकनापलीकडे गेली नाही.

परदेस परशुराम कोळी, हमदापूर.

☐ जॉय मुखर्जीचा पहिला चित्रपट कोणता? नायिका कोण? त्याने कोणते चित्रपट दिग्दर्शित केले?

— जॉय मुखर्जीचा पहिला चित्रपट *लव्ह इन सिमला*. नायिका साधना. त्याने दिग्दर्शित केलेले चित्रपट *हम साया, छैला बाबू*.